ePaper

राजस्थानच्या पंचायत निवडणुकीत काँग्रेसची मुसंडी; भाजपला धक्का

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

भाजपचा 'पॉलिटिकल बॅलन्स'; निष्ठावंतांना पहिली पसंती!

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 21 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

भारताचं टेंशन वाढलं; सरकार अलर्ट मोडवर

हॉर्मुझमध्ये भारताची 9 जहाजं धोक्यात

महाईन्यूज । नवी दिल्ली

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझच्या सामुद्रधुनीतील भारतीय जहाजांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या संवेदनशील सागरी क्षेत्रात भारतीय झेंडा असलेल्या नऊ जहाजांच्या सुरक्षेवर केंद्र सरकार विशेष लक्ष ठेवून आहे. व्यापारी जहाजांवर होणारे हल्ले आणि खलाशांच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेली चिंता लक्षात घेऊन केंद्र सरकारने सागरी सुरक्षा यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेतला.



होर्मुझमध्ये भारतीय जहाजांवर संकट!

होर्मुझच्या सामुद्रधुनीत भारतीय ध्वज असलेली नऊ जहाजे असून, त्यांच्या सुरक्षेवर केंद्र सरकार विशेष लक्ष ठेवून आहे. आतापर्यंत भारतीय जहाजांनी या सामुद्रधुनीतून ८६ वेळा प्रवास केला आहे. मंत्रालयाच्या ट्रॅकिंग मॉड्यूलद्वारे होर्मुझमधील ८०० हून अधिक आणि ओमानच्या आखातातील २०० हून अधिक जहाजांच्या हालचालींवर देखरेख ठेवली जात आहे. जहाजांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सागरी सुरक्षा अधिक मजबूत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक अत्यंत महत्त्वाची मानली जाते. भारताच्या ऊर्जा गरजा आणि व्यापारी वाहतुकीच्या दृष्टीनेही हा मार्ग महत्त्वाचा आहे. त्यामुळे या भागातील सुरक्षेतील कोणताही अडथळा भारतासाठी चिंतेचा विषय ठरू शकतो. या पार्श्वभूमीवर सोनोवाल यांनी सागरी प्रशासन महासंचालनालयाला संवेदनशील सागरी क्षेत्रात देखरेख आणि गस्त वाढविण्याचे निर्देश दिले आहेत.

आढावा बैठकीत जहाजे आणि त्यावरील भारतीय खलाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यावर भर देण्यात आला. धोकादायक सागरी क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करणे, जहाजांना वेळोवेळी सुरक्षाविषयक सूचना देणे आणि संभाव्य धोक्यांबाबत सतर्क करणे, अशा उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय शिपिंग कंपन्या आणि जहाजांच्या संचालकांशी नियमित संपर्क ठेवण्यासही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, विविध ठिकाणी व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांचा केंद्रीय मंत्री सोनोवाल यांनी निषेध केला असून, या घटनांमुळे खलाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतीय ध्वज असलेल्या जहाजांनी आतापर्यंत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून ८६ वेळा प्रवास केला आहे. या जहाजांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी मंत्रालयाने स्वतंत्र ट्रॅकिंग मॉड्यूल विकसित केले आहे. त्याद्वारे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील ८०० हून अधिक जहाजांच्या हालचालींवर देखरेख ठेवली जात आहे. तसेच होर्मुझच्या पूर्वेकडील ओमानच्या आखातातील २०० हून अधिक जहाजांवरही लक्ष ठेवण्यात येत आहे.

एलपीजी टँकरवरील हल्ल्याने चिंता

१६ नोव्हेंबर रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत एलपीजी टँकरवर हल्ला झाला होता. या जहाजावरील २४ भारतीय नागरिकांपैकी २१ जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली. हल्ल्यात काही खलाशी बेपत्ता झाले, तर जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. ओमानमधील भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या मदतीने बचावकार्य आणि खलाशांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवून आहे.

१६ नोव्हेंबर रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत एलपीजी टँकरवर झालेल्या हल्ल्याने भारतीय यंत्रणांची चिंता अधिक वाढवली आहे. या हल्ल्यानंतर जहाजावरील भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. जहाजावरील २४ भारतीय नागरिकांपैकी २१ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, तर काही खलाशी बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली. जखमी खलाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारताने या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

ओमानमधील भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने मदत आणि बचावकार्यावर लक्ष ठेवून आहे. होर्मुझ परिसरातील बदलती परिस्थिती, व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांचा धोका आणि भारतीय खलाशांची सुरक्षा लक्षात घेता केंद्र सरकारने सागरी यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या भागातील भारतीय जहाजांच्या हालचालींवर आगामी काळातही विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.

पार्थ पवार यांना उच्च न्यायालयाचा दिलासा!

मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी आरोपी करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली

महाईन्यूज । पुणे

राज्यसभा खासदार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते पार्थ पवार यांच्याविरोधात पुण्यातील मुंढवा येथील सुमारे ४० एकर शासकीय जमिनीच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. पुणे पोलिसांकडे तक्रार करूनही पार्थ यांच्याविरोधात गुन्हा दाखल न केल्याचा तसेच राजकीय वरदहस्तामुळे पुणे पोलीस पार्थ यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप करून 'भारत अगेंस्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी ही याचिका केली होती.



मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे शुक्रवारी ही याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी, याआधी देखील अशाच स्वरूपाची याचिका न्यायालयाने फेटाळली होती, असे राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले.तसेच, याचिकाकर्त्यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचा युक्तिवादही सरकारच्या वतीने करण्यात आला. त्याची न्यायालयाने दखल घेतली व आधी अशाच स्वरूपाची याचिका फेटाळलेली असताना त्याच मुद्द्यांच्या आधारे पुन्हा याचिका कशी केली ? असा प्रश्न याचिकाकर्त्यांच्या वकिलांना केला. याशिवाय, कोणताही अभ्यास किंवा संशोधन न करता याचिका केल्याबद्दलही न्यायालयाचे याचिकार्त्यांवर ताशेरे ओढले व याचिका फेटाळली.

दरम्यान, यासंदर्भात आपण मुंढवा पोलीस ठाण्यात, तसेच पुणे पोलीस आयुक्तांकडे गुन्हे दाखल करण्यासंदर्भात मागणी करूनही पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्यामुळे अखेर उच्च न्यायालयात धाव घेतल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी याचिकेद्वारे केला होता. अमेडिया एन्टरप्राइसेज कंपनीचे जवळपास ९९ टक्के समभाग हे पार्थ पवार यांच्याकडे असल्याचे माहीत असतानाही त्यांच्याऐवजी, कंपनीत केवळ एक टक्का समभाग असलेल्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यावरून, पार्थ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यास पोलीस प्रशासन टाळाटाळ करत आहे, असा आरोप पाटील यांनी याचिकेत केला होता.

याच प्रकरणातील एका आरोपीच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणीच्या वेळी उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने, पार्थ यांना या प्रकरणी आरोपी का करण्यात आले नाही ? असा प्रश्न करून राज्याच्या पोलीस महासंचालकांना त्यावर प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तर दाखल करण्यास सांगितले होते. त्यानंतर, प्रकरणाचा योग्य प्रकारे तपास करून योग्य ती कारवाई करण्याचे पोलीस महासंचालकांनी न्यायालयाला आश्वासित केले होते.

पुणे शहरात मोकळ्या जागांवर कचरा आढळल्यास होणार पाच लाखांचा दंड!

महाईन्यूज । पुणे

शहरातील खासगी किंवा सरकारी मोकळ्या जागांवर कचरा टाकणे आता भलतेच महागात पडणार आहे. 'ज्या मालकांच्या या जागा आहेत. त्यांनी आपल्या जागेत कचरा कुणी टाकणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे असून, त्यासाठी आपल्या जागांभोवती निळे, अथवा हिरवे पत्रे उभारून जागा बंदिस्त करणे आवश्यक आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास आणि संबंधित ठिकाणी कचरा आढळून आल्यास जागा मालकांकडून पाच लाख रुपये दंड घेतला जाईल,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.



महापालिकेच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या जागामालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. यासाठी १५ दिवसांची नोटीस बजाविण्यात येणार आहे. मुदतीत स्वच्छता न केल्यास संबधित जागामालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी सर्वाधिक पाच लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, घन कचरा विभागाचे प्रमुख संतोष वारूळे यावेळी उपस्थित होते.

शहरातील खासगी, सरकारी जागांवर, मोकळ्या ठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणावर कचरा आणि राडारोडा टाकतात. महापालिकेचे रस्तेसफाईचे काम यामुळे वाया जाते. पाणी, मोकळ्या जागा कचरा साठविण्याचे ठिकाण होऊ नये आणि या जागा संरक्षित राहाव्यात यासाठी संबधित जागा मालकांनी या जागांभोवती पत्रे उभारून त्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

हा आदेश शहरातील सरकारी, महापालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागांनाही लागू राहणार आहे. महापालिकेच्या ॲमेनिटी स्पेस व आरक्षणाअंतर्गत ताब्यात घेण्यात आलेल्या जागांच्या भोवतीदेखील पत्रे अथवा ग्रीन नेट उभारून त्या संरक्षित करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात येईल.भूसंपादन करताना महापालिका तीन फूट उंचीच्या भिंतींना जागा संरक्षित करून घेते, त्यानंतरच ताबा घेण्यात येतो. यापुढील काळात या जागांभोवती जागा मालकांकडूनच पत्रे अथवा ग्रीन नेट उभारून घेण्यासाठी आमचे प्रयत्न राहातील, असे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

मोकळ्या जागांची संख्या येणार समोर

पुणे शहर तसेच महापालिकेत समाविष्ट झालेल्या नवीन गावांमुळे मोठ्या प्रमाणात शहरात मोकळ्या जागा आहेत. मात्र या जागा नक्की किती आहे, याची निश्चित आकडेवारी प्रशासनाकडे नाही. ही आकडेवारी समोर यावी, यासाठी सर्वेक्षण केले जाणार असून त्यानंतर मोकळ्या जागांची संख्या समोर येणार आहे. महापालिका आयुक्त राम यांनी काढलेल्या आदेशामुळे मोकळ्या जागांची स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी संबंधित जागा मालकाची असणार आहे.

भाजपचा 'पॉलिटिकल बॅलन्स'; निष्ठावंतांना पहिली पसंती!

सात स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर; सव्वा वर्षांनंतर नव्या चेहऱ्यांना संधी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्वीकृत (नामनिर्देशित) सदस्यपदासाठी भारतीय जनता पक्षाने सात जणांची नावे जाहीर करण्यात आली. गेल्या ९ महिन्यांपासून हा विषय चर्चेत होता. सत्ताधारी भाजपाकडून कुणाला संधी मिळणार? अखेर 'सस्पेन्स' संपला आणि प्रदेश नेतृत्त्वाच्या निर्देशाप्रमाणे सत्ताधारु पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सात सदस्यांची नावे घोषित केली.



भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश नेतृत्वाने या नावांना मान्यता दिल्यानंतर महापालिकेतील सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी शुक्रवारी (२० नोव्हेंबर) प्रसिद्धिपत्रकाद्वारे अधिकृत घोषणा केली. जयनाथ काटे, राजेश पिल्ले, विशाल कलाटे, कुणाल लांडगे, कुलदीप परांडे, ऋषिकेश म्हेत्रे आणि सचिन साठे यांना पहिल्या टर्ममध्ये संधी मिळाली आहे.

स्वीकृत सदस्यपदाचा कार्यकाळ १५ महिने (सव्वा वर्ष) असेल, असे प्रशांत शितोळे यांनी प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे. या सूत्रानुसार, या पंचवार्षिक काळात भाजपाकडून आणि ३० सदस्यांना स्वीकृतपदी संधी मिळू शकते. भाजपाच्या जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी देण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. तसेच, १० प्रभाग कार्यालयांमध्ये प्रभाग समितीवर ३० सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामध्ये अनेकांना संधी मिळेल, असा दावा केला जात आहे.

वास्तविक, ज्या सदस्यांना स्वीकृत सदस्यपदी संधी मिळालेली आहे. त्यांनी महापालिका निवडणूक आणि संघटनात्मक कार्यात योगदान दिलेले आहे. तसेच, सामाजिक समतोलही या निमित्ताने साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पक्षकार्यात जे सक्रीय आणि 'रिझल्ट' देवून काम करीत आहेत. त्यांना संधी निश्चितपणे मिळणार, असा ठाम संदेश या निमित्ताने देण्यात आला आहे.

पिंपरी मतदार संघातून कुणाल लांडगे प्रभाग क्रमांक २० मधून इच्छुक होते. मात्र, त्यांना या ठिकाणी संधी मिळाली नाही. पक्षाच्या संघटनात्मक पदांवर त्यांनी काम केले आहे. भोसरी आणि पिंपरी मतदार संघाच्या 'बॉर्डर'वरील प्रभाग क्रमांक ९ मधून राजेश पिल्ले यांना महापालिका निवडणुकीत तिकीट मिळाले नव्हते. तसेच, शहरात दक्षिण भारतीय आणि हिंदीभाषिकांचे प्रमाण निर्णायक आहे. त्यामुळे अमराठी किंवा हिंदीभाषिक चेहरा म्हणून त्यांना संधी मिळाली असावी.

भोसरी मतदार संघाचा विचार करता, कुलदीप परांडे यांनी महापालिका निवडणूक २०१७ आणि २०२६ मध्ये प्रभाग क्रमांक ४ मधून तिकीट मिळाले नाही, तरी पक्षासाठी सक्षमपणे काम केले. त्या ठिकाणी त्यांना न्याय देण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहरात माळी समाजाचा प्रभाव मोठा आहे. समाजाचे प्रतिनिधीत्व या नात्याने चिखली प्रभाग १ मधील ऋषिकेश म्हेत्रे यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

... म्हणून 'या' सदस्यांना स्वीकृतपदी संधी

चिंचवड मतदार संघातून महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २५ मधून विशाल कलाटे यांनी तयारी केली होती. मात्र, या ठिकाणी पक्षाने राहुल कलाटे यांचा प्रवेश घेतला. त्यामुळे विशाल यांना तिकीट मिळाले नाही. त्यामुळे त्यांना स्वीकृतपदी संधी मिळाली आहे. पिंपळे सौदागरमधील सामाजिक कार्यकर्ते आणि पवना सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष जयनाथ काटे यांना संधी दिली आहे. प्रभाग क्रमांक २७ आणि गावकी-भावकीत त्यांना संपर्क मोठा आहे. सहकारी बँकिंगचा अनुभव आणि स्थानिक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांतील सहभाग ही त्यांची सार्वजनिक कामातील ओळख आहे. सचिन साठे यांनी महापालिका निवडणुकीत काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. मात्र, त्यांना भाजपाकडून प्रभाग क्रमांक २६ मधून तिकीट मिळाले नाही. त्यांना पक्षाने स्वीकृतपदी संधी दिली आहे.

> भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पक्षासाठी समर्पित भावनेतून काम करणाऱ्या आणि 'रिझल्ट' देणाऱ्या सहकाऱ्यांना पहिली संधी दिली जाईल, अशी भूमिका पक्षश्रेष्ठींनी घेतलेली आहे. सात स्वीकृत पदांसाठी अनेकजण इच्छुक होते. त्यासाठी स्थानिक पातळीवर आमचे चारही आमदार, प्रमुख पदाधिकारी यांनी त्यांच्या शिफारसी केल्या होत्या. कोअर कमिटीत याबाबत सविस्तर चर्चा झाली होती. त्यानंतर सर्व इच्छुकांची यादी पक्षश्रेष्ठींकडे पाठवण्यात आली. स्वीकृतची ही पदे सव्वा वर्षाकरिता (१५ महिने) दिली आहेत. भाजपा सत्ताकाळातील ५ वर्षांत आणखी किमान ३० जणांची स्वीकृतपदी वर्णी लागणार आहे. यासोबतच प्रभाग समितीवरही काम करण्यासाठी संधी आहे. त्यामुळे पक्ष आणि संघटनेचे काम प्रामाणिकपणे, पक्षाचा शिष्टाचार आणि कार्यक्रम-उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेणाऱ्यांना निश्चितपणे संधी मिळणार आहे. पक्षात नाराजी, गट-तट असा कोणताही प्रकार नाही. प्रत्येकाच्या कामाचे मूल्यमापण होते. ज्यांना आता संधी मिळालेली नाही, त्यांना १५ महिन्यानंतर निश्चितपणे संधी मिळणार आहे.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष
> तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

वायसीएममध्ये औषधांचा काळाबाजार? १.७२ कोटींचा निकृष्ट औषधसाठा जप्त!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (वायसीएम) सेंट्रल मेडिकल स्टोअरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल १ कोटी ७२ लाख रुपये बाजारमूल्य असलेला ॲलोपॅथिक औषधांचा साठा जप्त करण्यात आला आहे. या औषधांमध्ये निकृष्ट दर्जाची तसेच विनापरवाना उत्पादित औषधांचा समावेश असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे. या कारवाईमुळे महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.



अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत केअरझिंक, केअरगिल-२००, एलडीएलआर-५ आणि डोम्पेरिडोन यांसह काही औषधांच्या दर्जाबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्या. तसेच काही औषधांच्या पॅकिंगवर केवळ शासकीय पुरवठ्यासाठी असा उल्लेख असतानाही ती औषधे निकृष्ट दर्जाची आणि विनापरवाना उत्पादित असल्याचे स्पष्ट झाले.

विशेष म्हणजे, औषधांच्या गुणवत्तेबाबत आधीच संशय निर्माण झाल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्वतःहून अन्न व औषध प्रशासनाला याबाबत कळवले होते. त्यानंतर FDA ने तपासणी करून औषधसाठ्याच्या गुणवत्तेची पडताळणी केली. तपासणी अहवालानंतर प्रशासनाने संबंधित औषधसाठा जप्त करण्याची कारवाई केली.

या प्रकरणात औषधांचा पुरवठा करणाऱ्या मे. श्री विनायक फार्मा कंपनीला पुढील तीन वर्षांसाठी महापालिकेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तर जेजुरी येथील औषध उत्पादक कंपनी मे. इंडुकेअर फार्मास्युटिकल्स अँड रिसर्च सेंटरला ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने या कारवाईची माहिती दिली आहे. रुग्णांच्या उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेत गंभीर त्रुटी आढळल्याने रुग्णांच्या आरोग्यसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये पुरवठा होणाऱ्या औषधांची गुणवत्ता तपासणी आणि खरेदी प्रक्रियेवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज या घटनेतून अधोरेखित झाली आहे.

रुग्णांच्या जिवाशी खेळ; औषधांचा दर्जा निकृष्ट!

वायसीएमच्या सेंट्रल मेडिकल स्टोअरमधील १.७२ कोटींचा औषधसाठा जप्त; औषध पुरवठादार कंपनीवर तीन वर्षांची बंदी, उत्पादक कंपनी ब्लॅकलिस्ट.

औषधांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह!


वायसीएम रुग्णालयातील १ कोटी ७२ लाखांचा औषधसाठा FDA ने जप्त केला. निकृष्ट व विनापरवाना औषधांप्रकरणी श्री विनायक फार्माला तीन वर्षांची निविदाबंदी, तर इंडुकेअर फार्मास्युटिकल्स कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्यात आले.

श्रमिकांच्या हक्कांना नवे कायदेशीर बळ!

भूमिका

महाराष्ट्र शासनाने ५ नोव्हेंबर २०२६ पासून लागू केलेले 'महाराष्ट्र वेतन नियम, २०२६' हा राज्यातील कामगार वर्गासाठी महत्त्वाचा आणि स्वागतार्ह बदल आहे. औद्योगिक प्रगतीत देशात आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राच्या विकासात लाखो कामगारांचे योगदान आहे. मात्र, या कामगारांना त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यात न्याय मिळतो का, हा प्रश्न कायमच उपस्थित होत असतो.

कमी वेतन, अतिरिक्त कामाचे तास, अनियमित पगार आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अशा समस्यांमुळे कामगारांचे शोषण होत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या वेतन संहिता, २०१९ च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली नवी नियमावली कामगारांच्या हक्कांना अधिक संरक्षण देणारी ठरू शकते.



नव्या नियमांनुसार दिवसाला आठ तास आणि आठवड्याला ४८ तास कामाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अतिरिक्त कामासाठी दुप्पट वेतन, साप्ताहिक सुटी आणि महागाई भत्त्यात वर्षातून दोनदा सुधारणा या तरतुदी कामगारांच्या हिताच्या आहेत. विशेष म्हणजे, कामाच्या नगानुसार मोबदला घेणाऱ्या कामगारांनाही संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे केवळ नियमित वेतनधारकच नव्हे, तर विविध प्रकारच्या कामांमध्ये गुंतलेल्या कष्टकऱ्यांनाही न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वेतनातील भत्त्यांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त रक्कम मूळ वेतनात समाविष्ट करण्याची तरतूदही महत्त्वाची आहे. यामुळे भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युइटीच्या रकमेत वाढ होण्यास मदत होईल.

कामगारांना वेतनाच्या दिवशी किंवा त्यापूर्वी वेतनपावती देणे बंधनकारक केल्याने आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता येईल. वेतनातून होणाऱ्या कपातीवर मर्यादा, दंडापूर्वी कारणे दाखवा नोटीस आणि कंत्राटी कामगारांच्या बोनसची मुख्य कंपनीवर निश्चित केलेली जबाबदारी यामुळे कामगारांना कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. मात्र, नियमावली तयार करणे आणि तिची प्रभावी अंमलबजावणी करणे यात मोठे अंतर असते. वाढलेल्या सामाजिक सुरक्षेच्या आर्थिक जबाबदाऱ्या टाळण्यासाठी काही कंपन्या वेतनरचनेत बदल करू शकतात. ओव्हरटाइमची नोंद टाळणे, कंत्राटी पद्धतीचा अवलंब करणे किंवा पदनामांमध्ये बदल करून कामगारांना संरक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ नियम करून शासनाची जबाबदारी संपत नाही. कामगारांच्या तक्रारींची दखल घेणारी आणि दोषी व्यवस्थापनावर कारवाई करणारी सक्षम यंत्रणा उभी राहणे आवश्यक आहे.

उपस्थिती, वेतन आणि अतिरिक्त कामाच्या नोंदी पाच वर्षे जतन करण्याची अट तसेच ऑनलाइन तक्रारींची सुविधा यामुळे गैरव्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते. मात्र, असंघटित क्षेत्रातील कामगारांपर्यंत या सुविधांची माहिती पोहोचविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कायद्याची माहिती नसल्यामुळे अनेक कामगार अन्याय सहन करतात. त्यामुळे जनजागृती, नियमित तपासणी आणि तक्रारींचे वेळेत निवारण यावर भर द्यावा लागेल.

शेवटी, उद्योगांची प्रगती केवळ उत्पादन आणि नफ्याच्या आकड्यांवर मोजता येत नाही. त्या उद्योगात काम करणाऱ्या श्रमिकांचे जीवनमान किती उंचावले, यालाही तितकेच महत्त्व आहे. कामगारांचे शोषण रोखून त्यांना न्याय्य वेतन, सुरक्षित भविष्य आणि सन्मानाचे जीवन देणे ही शासनासह उद्योग व्यवस्थापनाचीही जबाबदारी आहे. नव्या वेतन नियमांनी त्यासाठी संधी निर्माण केली आहे. आता ही संधी प्रत्यक्षात उतरविण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. श्रमिकांच्या घामाला योग्य दाम आणि त्यांच्या कष्टांना सन्मान मिळाला, तरच महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला खरा अर्थ प्राप्त होईल.

प्रासंगिक »

मोलाची जाणीव

एका गावात रामू नावाचा कुंभार राहत होता. तो मातीपासून सुंदर मडकी, पणत्या आणि भांडी बनवत असे. त्याच्या हातात विलक्षण कला होती; मात्र गावातील लोक त्याच्या वस्तूंची किंमत कमी करत असत.

त्यामुळे त्याला मेहनतीचा योग्य मोबदला मिळत नव्हता. एकदा गावात मोठा उत्सव आयोजित करण्यात आला. आयोजकांनी रामूला शंभर मडकी बनवण्याची ऑर्डर दिली. रामूने दिवसरात्र मेहनत करून वेळेत मडकी तयार केली.

उत्सवाच्या दिवशी सर्व मडकी सजवण्यात आली. त्यांची सुंदरता पाहून गावकरी भारावून गेले. एका वृद्धाने रामूला विचारले, "एवढी सुंदर कलाकृती बनवण्यासाठी तुला किती वेळ लागला?" रामू हसून म्हणाला, "मडके बनवायला काही तास लागतात; पण त्यामागची कला शिकण्यासाठी अनेक वर्षे खर्ची घालावी लागतात."

हे ऐकून गावकऱ्यांना त्याच्या मेहनतीची जाणीव झाली. त्यांनी त्याला योग्य मोबदला देण्याचा निर्णय घेतला.

- तात्पर्य : प्रत्येक कामाचे मोल त्यामागील कष्टांत असते.

१२ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या नव्या दरांनुसार दुधाच्या विविध प्रकारांत प्रतिलिटर दोन ते चार रुपयांची वाढ झाली आहे. महागाईने आधीच त्रस्त असलेल्या सर्वसामान्य ग्राहकांना ही दरवाढ आर्थिकदृष्ट्या जाणवणार आहे.

दूध महागले; पण शेतकऱ्याच्या पदरात किती पडले?

मात्र, दूध महागले म्हणजे दूध उत्पादक शेतकऱ्याच्या उत्पन्नातही वाढ झाली, असे म्हणता येणार नाही. दरवाढीचा खरा लाभ कोणाच्या खिशात जातो, हा यानिमित्ताने उपस्थित झालेला महत्त्वाचा प्रश्न आहे.

राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. हिरवा चारा उपलब्ध नाही, कोरड्या चाऱ्याचे दर वाढले आहेत. पशुखाद्य, औषधे, मजुरी आणि जनावरांच्या देखभालीचा खर्चही वाढत आहे. बदलत्या हवामानामुळे दूध उत्पादनावर परिणाम होत आहे. पूर्वी माळरानावर चरणारी जनावरे आता गोठ्यात सांभाळावी लागत असल्याने चाऱ्याचा खर्च वाढला आहे. अशा परिस्थितीत दूध उत्पादकाला मिळणारा दर त्याच्या प्रत्यक्ष उत्पादन खर्चाशी सुसंगत असणे गरजेचे आहे.

दूध ग्राहकापर्यंत पोहोचण्यापूर्वी संकलन, शीतकरण, वाहतूक, प्रक्रिया आणि वितरण अशा अनेक टप्प्यांतून जाते. त्यामुळे किरकोळ विक्रीदरातील संपूर्ण वाढ उत्पादकाला मिळेलच, असे नाही. अमूल आणि मदर डेअरीसारख्या संस्थांनी विक्रीतील मोठा हिस्सा



उत्पादकांना दिला जात असल्याचे यापूर्वी सांगितले आहे. मात्र, प्रत्यक्षात वाढीव दराचा किती लाभ शेतकऱ्यांना मिळतो, याचा हिशेब पारदर्शकपणे समोर आला पाहिजे. दूध संघांनी खरेदी दर आणि विक्री दर यांतील तफावत स्पष्ट करणे आवश्यक आहे.

सहकार व्यवस्थेचा मूळ उद्देश उत्पादकांचे आर्थिक हित जपणे हा आहे. मात्र, काही ठिकाणी दूध संघांमधील संचालकपदे प्रतिष्ठा आणि सुविधांचे केंद्र बनल्याचे दिसते. संचालकांचे मानधन, वाहनखर्च आणि अन्य प्रशासकीय खर्च यांवर नियंत्रण असावे. दूध उत्पादकांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढवून दर निश्चित करताना उत्पादन खर्चाचा विचार केला पाहिजे. कारण सहकारात उत्पादक दुय्यम ठरला, तर सहकाराचा मूळ हेतूच हरवेल.

दुग्धव्यवसाय हा चोवीस तासांची जबाबदारी असलेला व्यवसाय आहे. चारा-पाणी, स्वच्छता, दूध काढणे आणि जनावरांची देखभाल यासाठी शेतकरी कुटुंबातील सदस्य अहोरात्र मेहनत घेतात. विशेषतः महिलांचे योगदान मोठे असते. त्यांच्या श्रमाचे आर्थिक मूल्यही दूधदर ठरवताना विचारात घेतले पाहिजे. त्याचबरोबर चारा उत्पादन, मुरघास निर्मिती आणि पाणीपुरवठ्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दुधाची दरवाढ ही केवळ ग्राहकांच्या खिशाला बसणारी झळ ठरू नये. तिचा लाभ प्रत्यक्ष दूध उत्पादकाच्या घरापर्यंत पोहोचला पाहिजे. दुष्काळात पशुपालक टिकला, तरच भविष्यात दूधपुरवठा टिकेल. त्यामुळे ग्राहक, दूध संघ आणि शासन या तिघांनीही आपापली जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. ज्याच्या श्रमातून दूध निर्माण होते, त्याच्या घरात आर्थिक समृद्धी पोहोचली, तरच सहकार खऱ्या अर्थाने यशस्वी झाला, असे म्हणता येईल.

।। अभंगवाणी ।।



कोडें रे कोडें ऐका हें कोडें ।
उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ॥१॥

पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई ।
रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

लग्नाचे आमिष दाखवून १४ महिलांची फसवणूक

महाराष्ट्रातून फरार झालेल्या मोहम्मद माझिनला यूएईमधून आणले भारतात

महाईन्यूज । मुंबई

लग्नाचे खोटे आमिष दाखवून महिलांचे लैंगिक आणि आर्थिक शोषण करणाऱ्या महाराष्ट्रातील एका फरारी आरोपीला यूएईमधून भारतात प्रत्यार्पित करण्यात आले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या समन्वयाने शुक्रवारी, २० नोव्हेंबर रोजी ही कारवाई पार पडली. मोहम्मद माझिन असे या आरोपीचे नाव असून, त्याच्याविरोधात इंटरपोलची रेड नोटीस जारी करण्यात आली होती. परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, केंद्रीय गृह मंत्रालय, महाराष्ट्र पोलीस आणि यूएईमधील सुरक्षा यंत्रणांच्या संयुक्त सहकार्यातून 'सीबीआय'ने या मोहिमेचे समन्वयन केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.



सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोहम्मद माझिन याने एका महिलेला लग्नाचे आमिष दाखवून जाळ्यात ओढले. तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करून तिचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण केले. त्याने पीडितेकडून १८ लाख रुपये उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणी संबंधित न्यायालयात यापूर्वीच आरोपपत्र दाखल करण्यात आल्याचे सीबीआयच्या प्रवक्त्या बीना यादव यांनी सांगितले.

पुढील तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, माझिन याने अशाच प्रकारे लग्नाचे आमिष दाखवून आणखी १३ महिलांची फसवणूक व शोषण केल्याचे उघड झाले आहे. या महिलांकडून पैसे उकळण्यासह त्याने त्यांच्या खासगी क्षणांचे व्हिडिओही चित्रित केले होते. हे गुन्हे उघडकीस आल्यानंतर आरोपी परदेशात पळून गेला होता. त्यामुळे महाराष्ट्र पोलिसांनी त्याचा शोध घेऊन अटक करण्यासाठी केंद्राची मदत मागितली होती.

महाराष्ट्र पोलिसांच्या विनंतीवरून नवी दिल्लीतील सीबीआयच्या नॅशनल सेंट्रल ब्युरोने माझिनविरोधात इंटरपोलची रेड नोटीस जारी केली. या नोटीसच्या आधारे यूएईच्या सुरक्षा यंत्रणांनी तांत्रिक तपासाद्वारे आरोपीचा ठावठिकाणा शोधून त्याला अटक केली. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर यूएई प्रशासनाने त्याच्या भारत प्रत्यार्पणास मंजुरी दिली.

त्यानंतर महाराष्ट्र पोलिसांचे एक विशेष पथक यूएईला रवाना झाले. तेथील अधिकाऱ्यांनी माझिनला या पथकाच्या ताब्यात दिले. शुक्रवारी, २० नोव्हेंबर रोजी हे पथक आरोपीला घेऊन कोची आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले.

३०० हून अधिक फरारी गुन्हेगार भारतात

भारतासाठी इंटरपोलचे 'नॅशनल सेंट्रल ब्युरो' म्हणून काम करणारी सीबीआय संस्था 'भारतपोल' या प्रणालीद्वारे देशभरातील पोलीस यंत्रणांशी समन्वय साधून आंतरराष्ट्रीय स्तरावर गुन्हेगारांचा शोध घेते. इंटरपोलच्या माध्यमातून २०१९ पासून आतापर्यंत ३०० हून अधिक वाँटेड गुन्हेगारांना यशस्वीरित्या भारतात परत आणण्यात आले आहे. यापैकी एकट्या २०२६ या वर्षात आतापर्यंत ७४ फरारी आरोपींना भारतात आणण्यात यश आल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे.

नागपूरचे नाव 'दीक्षाभूमी' करा; संजय राऊत, उद्धव ठाकरेंची मागणी

महाईन्यूज । नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील सामाजिक क्रांतीची सुरुवात नागपुरातून झाली, त्यामुळे नागपूरचे नाव 'दीक्षाभूमी' करणे ही त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत म्हणाले. यावर आता नागपूरचे पालकमंत्री व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'संजय राऊत काय सांगतात, यापेक्षा दीक्षाभूमीचे महत्त्व संपूर्ण जगाला माहीत आहे', असे सुनावले. त्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकारने नागपूरच्या नामांतराचा प्रस्ताव तयार केल्यास त्या निर्णयाला त्यांचा पक्ष पाठिंबा देईल, उद्धव ठाकरे यांनीही यासंदर्भात सूचना केल्याचा दावा राऊत यांनी केला. यावर शुक्रवारी नागपुरात प्रसारमाध्यमांसोबत बोलताना महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, नागपूरची दीक्षाभूमी जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे. नागपुरात येणारा प्रत्येक व्यक्ती दीक्षाभूमीला भेट देतो. दीक्षाभूमीच्या नावानेच नागपूरची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. दीक्षाभूमीचे महत्त्व संपूर्ण जगाला माहीत आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

कोकणातील आंब्याच्या जिओ टॅगिंगच्या मुद्द्यावर चेन्नई न्यायालयाने आदेश दिले असून, न्यायालयाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्य सरकारने याबाबत स्वतंत्र शासन निर्णय काढलेला नाही. त्यामुळे या प्रकरणाशी राज्य सरकारचा थेट संबंध नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

इंदू मिल स्मारक प्रकल्पाची किंमत वाढली असली तरी राज्य सरकारने आवश्यक निधी उपलब्ध करून दिला आहे. इंदू मिल येथील स्मारकाचा संपूर्ण प्रकल्प आमचे सरकार पूर्ण करणार आहे. काही काळ आवश्यक साहित्य उपलब्ध न झाल्यामुळे कामाला विलंब झाला. मात्र, उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे बावनकुळे म्हणाले.



सातारा बँक प्रकरण हा स्थानिक राजकारणाशी संबंधित विषय आहे. एखाद्या जिल्ह्यातील स्थानिक विषयांवर मतभेद असू शकतात. मात्र, त्याचा परिणाम महायुतीवर होणार नाही. त्यामुळे या प्रकरणाचा महायुतीशी संबंध जोडण्याची आवश्यकता नाही, असे ते म्हणाले.

राज्यातील भटक्या समाजाच्या वस्त्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत येत्या ७ आणि ८ जानेवारी रोजी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून नागरिकांना जन्मदाखले, घरांचे दस्तऐवज, विविध शासकीय दाखले तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

फासेपारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न

फासेपारधी समाजाच्या विकासासंदर्भात बोलताना बावनकुळे म्हणाले की, या समाजासाठी गावठाणे गठित करणे, तांड्यांना ग्रामपंचायतीचे अधिकार देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि रोजगार निर्मितीसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, या विषयांवर बैठक घेण्यात आली आहे. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सकारात्मक असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

बांगलादेशात पुन्हा हिंसाचाराचा भडका!

शेख हसीनांच्या परतीच्या घोषणेनंतर जाळपोळ, तोडफोड; युनूस यांच्या संस्थाही लक्ष्य!

महाईन्यूज । बांगलादेश

भारताच्या सीमेला लागून असलेल्या बांगलादेशात पुन्हा एकदा हिंसाचाराचा भडका उडाला. गुरुवारी संतप्त आंदोलकांनी अनेक सरकारी कार्यालयांची तोडफोड केली. काही ठिकाणी भीषण स्फोटही घडवून आणण्यात आले. गेल्या आठवडाभरात काही राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्याच्या घटना समोर आल्या. तसेच नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या घरालाही आग लावण्यात आली. ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात असाच हिंसाचार उफाळून आला होता. त्यावेळी झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना देश सोडून पलायन करावे लागले होते.

सध्या भारतात आश्रय घेणाऱ्या शेख हसीना यांनी डिसेंबरमध्ये बांगलादेशात परतण्याचा इरादा जाहीर केला. त्यांची ही घोषणा सध्याच्या हिंसाचारामागील तातडीचे कारण ठरली. हसीना यांच्या अवामी लीग पक्षावर याआधीच बंदी घालण्यात आली आहे. बांगलादेश सरकारने त्यांना नवीन पासपोर्ट आणि राष्ट्रीय ओळखपत्र देण्यास नकार दिल्यानंतर अवामी लीग पक्षाने देशव्यापी आंदोलनाची हाक दिली. या अस्थिरतेला आता राजकीय वळणही लागले.

बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना अवामी लीगच्या नेत्यांनी बांगलादेशी जनतेच्या हिताचा कधीच विचार केला नसल्याची टीका केली. तसेच



सीमापार आश्रय घेणाऱ्या हसीना तेथील जनतेला खूश करण्यासाठी बांगलादेशात हिंसाचार घडवून आणण्यासाठी कटकारस्थाने रचत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. यावेळी त्यांनी भारताचे नाव घेणे टाळले.

शेख हसीना यांनी डिसेंबरमध्ये बांगलादेशात परतण्याची योजना जाहीर केली होती. मायदेशी परतण्यासाठी त्यांनी नवीन पासपोर्ट आणि राष्ट्रीय ओळखपत्राची मागणी केली. त्यानंतर बांगलादेशातील आंदोलनांना सुरुवात झाली. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश सरकारने हसीना यांची मागणी फेटाळून लावली. त्याऐवजी भारतासोबत झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार शेख हसीना यांना बांगलादेशच्या ताब्यात देण्यात यावे, अशी भूमिका सरकारने घेतली.

त्यानंतर अवामी लीगने आठवडाभर आंदोलन करण्याची घोषणा केली. या आंदोलनाची सांगता गुरुवारी देशव्यापी बंदने झाली. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. अवामी लीगचा अजूनही मोठा जनाधार असलेल्या बांगलादेशच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये बंदचा सर्वाधिक परिणाम दिसून आला. या आंदोलनादरम्यान वाहने, राजकीय पक्षांची कार्यालये, बाजारपेठा आणि निवासी मालमत्तांवर हल्ले करण्यात आले.

बुधवारी रात्री सत्ताधारी पक्षाशी संबंधित दोन कार्यकर्त्यांची हत्या झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. हिंसाचार नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाने सात जिल्ह्यांमध्ये बांगलादेश बॉर्डर गार्डच्या ९७ तुकड्या तैनात केल्या आहेत. दरम्यान, ढाका पोलिसांनी २४ तासांत अवामी लीग आणि तिच्याशी संबंधित संघटनांशी संबंध असल्याचा संशय असलेल्या १०७ जणांना अटक केली. यामध्ये माजी शिक्षणमंत्री नुरुल इस्लाम नाहिद यांचाही समावेश आहे.

मोहम्मद युनूस यांच्या संस्थांना लक्ष्य का केले जात आहे?

बांगलादेशातील हिंसाचाराची झळ मोहम्मद युनूस यांच्याशी संबंधित मालमत्ता आणि संस्थांनाही बसली. शेख हसीना यांची सत्ता गेल्यानंतर युनूस यांनी अंतरिम सरकारचे नेतृत्व केले होते. बुधवारी रात्री चट्टोग्राम येथील त्यांच्या वडिलोपार्जित घराला आग लावण्यात आली. याबाबत पोलिस अधिकारी मोजम्मेल हक यांनी रॉयटर्सला सांगितले की, गुरुवारी काही अज्ञात व्यक्तींनी युसून राहत असलेल्या इमारतीच्या तळमजल्यावरील वापरात नसलेल्या खोलीत ज्वलनशील पदार्थ फेकली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. हल्लेखोरांनी युनूस यांनी स्थापन केलेल्या ग्रामीण बँकेच्या शाखांनाही लक्ष्य केले. एपीच्या वृत्तानुसार, १० ते १९ नोव्हेंबर या कालावधीत ४० जिल्ह्यांमधील किमान ७२ शाखांची जाळपोळ आणि तोडफोड करण्यात आली. मोहम्मद युनूस यांनी १८ महिने बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे नेतृत्व केले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांनी तारिक रहमान यांच्या निवडून आलेल्या सरकारकडे सत्तेची सूत्रे सोपवली होती.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आईचे निधन!

महाईन्यूज । उत्तर प्रदेश

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. योगींची आई सावित्री देवी यांचं वयाच्या 91 व्या वर्षी निधन झालं आहे. उत्तराखंड येथील पौडी गढवाल जिल्ह्यातील राहत्या घरी सावित्री देवी यांनी अखेरचा श्वास घेतला. पौडीचे एसएसपी सर्वेश कुमार यांनी सावित्री देवींच्या निधनाची पुष्टी केली आहे. सावित्री देवी या पौडी गढवाल जिल्ह्यातील पंचूर गावात राहत होत्या. याच गावात योगी आदित्यनाथ यांचा जन्म झाला होता. त्यांचे वडील आनंद सिंह बिष्ट हे वन विभागात कार्यरत होते. 2020 मध्ये वयाच्या 89व्या वर्षी आनंद सिंह बिष्ट यांचं निधन झालं आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे गोरखपूर येथे एका सभेला संबोधत असतानाच त्यांना आईच्या निधनाची बातमी समजली. दरम्यान, योगी आदित्यनाथ यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. तसेच आदित्यनाथ हे पौडी गढवालला जाणार की नाही हे अद्याप स्पष्ट



झालेलं नाही. योगी आदित्यनाथ यांच्या वडिलांचे निधन झाले तेव्हा कोरोना होता. त्यामुळे कोव्हिड प्रोटोकॉलमुळे योगी आदित्यनाथ वडिलांच्या अंतिम संस्काराला जाऊ शकले नव्हते. उत्तर प्रदेशात कोरोना संकट आहे. लॉकडाऊन लागला आहे. त्यामुळे वडिलांचं अंत्यदर्शन घेऊ शकत नाही, असं योगी आदित्यनाथ त्यावेळी म्हणाले होते.

दरम्यान, सावित्री देवी यांना योगी आदित्यनाथ यांच्यासह चार मुले आणि तीन मुली आहेत. मानेंद्र सिंह, महेंद्र सिंह, शैलेंद्र मोहन आणि पुष्पा देवी, कौशल्या आणि शशि देवी आदी बहीण भावंडांचा यात समावेश आहे.

योगी आदित्यनाथ यांचं मूळ नाव अजय सिंह बिष्ट आहे. त्यांचा जन्म 5 जून 1972 मध्ये उत्तराखंडच्या पौडी गढवाल जिल्ह्यातील पंचूर गावात झाला होता. 1994 मध्ये योगी आदित्यनाथ यांनी संसारिक जीवनाचा त्याग करून संन्यास घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर गोरखपूर येथील गोरक्षपीठात ते सामील झाले. महंत अवैद्यनाथ यांचे ते शिष्य बनले. संन्यास घेतल्यानंतर आदित्यनाथ यांच्या कुटुंबाच्या भेटीगाठी कमी झाल्या. पण आईशी त्यांचा संपर्क होता. मुख्यमंत्री झाल्यावरही ते अधूनमधून आपल्या गावी जाऊन कुटुंबाला भेटायचे.

मे 2022मध्ये योगी आदित्यनाथ सुमारे पाच वर्षानंतर आपल्या गावी पंचूरला गेले होते. यावेळी त्याने आई सावित्री देवी यांच्यासह कुटुंबातील सदस्यांची भेट घेतली होती. गावात त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. योगी आपल्या घरी रात्रभर थांबले होते.

जून 2024मध्ये योगी आदित्यनाथ आपल्या आईला भेटण्यासाठी ऋषिकेशच्या एम्सला गेले होते. वयोमानानुसार तब्येत बिघडल्याने सावित्री देवींना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. यावेळी त्यांनी आईची भेट घेऊन डॉक्टरांकडूनही प्रकृतीची माहिती घेतली होती. तब्बल 20 मिनिटे ते आईसोबत होते.

समांथा रूथ प्रभू 39 व्या वर्षी झाली आई!

अभिनेत्री समांथा रूथ प्रभू आणि दिग्दर्शक-निर्माता राज निदिमोरू यांच्या आयुष्यात आनंदाचा मोठा क्षण आला आहे. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी समांथाने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे. समांथाने इन्स्टाग्रामवर एक हृदयस्पर्शी फोटो पोस्ट करत चाहत्यांसोबत ही गोड बातमी शेअर केली आहे. या फोटोमध्ये समांथा आणि राज यांनी आपल्या चिमुकल्या बाळाचा हात प्रेमाने हातात धरलेला दिसत आहे.

३९ वर्षीय समांथाने इन्स्टाग्रामवर एक फोटो पोस्ट केला. फोटोत तिने व राजने बाळाचा हात हातात घेतला आहे. विशेष म्हणजे समांथाने मुलाचं नाव देखील जाहीर केलं आहे. "आमचा सुंदर मुलगा देव निदिमोरू. १९/११/२०२६. आम्ही खूप आनंदी आहोत," असं कॅप्शन समांथाने या पोस्टला दिलं आहे.

समांथाच्या या पोस्टवर चाहत्यांनी लाइक्स व कमेंट्सचा



वर्षाव केला आहे. नयनतारा, तमन्ना भाटिया, वरुण धवनसह अनेकांनी या पोस्टवर कमेंट्स करून समांथा व राजचं अभिनंदन केलं आहे.

समांथा रूथ प्रभू हिने आणि दिग्दर्शक-निर्माता राज निदिमोरूशी १ डिसेंबर २०२५ रोजी दुसरं लग्न केलं. तमिळनाडूतील कोईम्बतूर येथील ईशा योग केंद्रातील लिंग भैरवी मंदिरात अत्यंत खासगी आणि आध्यात्मिक वातावरणात त्यांनी पारंपरिक 'भूत शुद्धी विवाह' पद्धतीने लग्न केलं. समांथाने जून २०२६ मध्ये तिच्या 'मा इंटि बंगारम' चित्रपटाच्या 'सक्सेस मीट'मध्ये गरोदर असल्याची घोषणा केली होती. सप्टेंबर २०२६ मध्ये दोघांनी ईशा योग केंद्रात पारंपरिक पद्धतीने डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला. आता १९ नोव्हेंबर रोजी त्यांनी आपल्या मुलाचं स्वागत केलं. त्यांनी मुलाचं नाव देव ठेवलं आहे.

'धर्मन' श्रीलीलाची एन्ट्री!





दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री श्रीलीलाच्या हातात आणखी एक मोठा चित्रपट आला आहे. सुपरस्टार रजनीकांत यांच्या आगामी 'धर्मन' या तामिळ चित्रपटात ती महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या माध्यमातून श्रीलीला पहिल्यांदाच रजनीकांत यांच्यासोबत स्क्रीन शेअर करणार आहे. अश्वथ मरिमुथु या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. धर्मम चित्रपटात रजनीकांत आणि श्रीलीला यांच्यासह नयनतारा, सिमरन, योगी बाबू आणि राशी खन्ना हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. अश्वथ मरिमुथु पहिल्यांदाच रजनीकांत यांचे दिग्दर्शन करत असल्याने या चित्रपटाबाबत विशेष उत्सुकता आहे. चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरनुसार रजनीकांत डॉक्टरच्या भूमिकेत दिसणार आहेत. निर्मात्यांनी त्यांच्या व्यक्तिरेखेचे वर्णन 'केट्टा पायन' म्हणजेच वाईट मुलगा असे केले आहे. हे नाव 1978 मध्ये प्रदर्शित रजनीकांत यांच्या 'मुल्लुम मलारुम' या चित्रपटातील लोकप्रिय व्यक्तिरेखेची आठवण करून देते. श्रीलीलाने याचवर्षी 'पराशक्ती' या चित्रपटातून तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटात ती शिवकार्तिकेयन, रवी मोहन आणि अथर्वा यांच्यासोबत झळकली होती.

तारा सुतारियाची 'तुम ही आना'मध्ये वर्णी!

बॉलिवूडमध्ये नव्या रोमँटिक जोडीची चर्चा सुरू झाली आहे. अभिनेता आदित्य रॉय कपूर आणि अभिनेत्री तारा सुतारिया हे दोघे पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहेत. दिग्दर्शक मिलाप मिलन जवेरी यांच्या आगामी संगीतमय आणि उत्कट प्रेमकथेसाठी तारा सुतारियाची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटाचे तात्पुरते नाव 'तुम ही आना' ठेवण्यात आले असून, निर्माते भूषण कुमार या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. या चित्रपटाचे नाव मिलाप जवेरी यांच्या 2019 मधील 'मरजावां' या चित्रपटातील लोकप्रिय 'तुम ही आना' या रोमँटिक गाण्यावरून घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या गाण्यात तारा सुतारियाही झळकली होती. त्यामुळे नव्या चित्रपटाच्या नावाला जुन्या गाण्याची भावनिक जोड मिळाली आहे. हा चित्रपट संगीतमय, उत्कट आणि भावनांनी भरलेली प्रेमकथा असणार असल्याचे सांगितले जात आहे. आदित्य रॉय कपूर आणि तारा सुतारिया यांची पडद्यावरची ही पहिलीच जोडी असेल. आदित्यने यापूर्वी 'आशिकी 2', 'मलंग' आणि 'मेट्रो... इन दिनों' यांसारख्या चित्रपटांतून रोमँटिक तसेच गंभीर भूमिका साकारल्या आहेत. तर तारा सुतारियाने 'मरजावां' आणि 'एक व्हिलन रिटर्न्स'मधून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे या नव्या जोडीला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण होण्याची शक्यता आहे. चित्रपटाचे चित्रीकरण यंदा वर्षाच्या अखेरीस सुरू होण्याची शक्मयता आहे. 2027 मध्ये हा चित्रपट चित्रपटगृहांत प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे.

क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा गद्दार

डिव्हिलियर्सने उस्मान ख्वाजाला सुनावले खडेबोल; फॅनी डिव्हिलियर्स यांची बोचरी टीका

महाईन्यूज । नवी दिल्ली

ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू उस्मान ख्वाजा याच्या आत्मचरित्रामुळे क्रिकेटविश्वात नव्या वादाला तोंड फुटले आहे. ख्वाजाने आपल्या 'सब्र' (Sabr) या आत्मचरित्रातून २०१८ मधील बहुचर्चित 'सँडपेपरगेट' प्रकरणाबाबत काही नवे खुलासे केले आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. या वादात आता दक्षिण आफ्रिकेचे माजी वेगवान गोलंदाज फॅनी डिव्हिलियर्स यांनीही उडी घेतली असून, त्यांनी ख्वाजावर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली आहे.



'ख्वाजा हा कदाचित क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा गद्दार आहे,' असे खळबळजनक विधान त्यांनी केले आहे. २०१८ मध्ये ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये घडलेले सँडपेपरगेट प्रकरण यापूर्वीच हाताळले गेले आहे. त्यातील चुका आणि गैरप्रकारांवर कारवाईही झाली होती. मात्र, आता जुन्या प्रकरणाला पुन्हा उजाळा देण्याची गरज नव्हती, असे मत त्यांनी व्यक्त केले. ख्वाजाने या प्रकरणातील गोष्टी पुन्हा सार्वजनिक करून ऑस्ट्रेलियन क्रिकेटची प्रतिमा मलिन केली असल्याचा आरोपही डिव्हिलियर्स यांनी केला.

त्यांच्या मते, हा वाद केवळ एखादी गोष्ट योग्य की अयोग्य, एवढ्यापुरता मर्यादित नाही. संबंधित प्रकरणावर यापूर्वीच निर्णय झाला असताना पुन्हा त्यातील जुन्या जखमा उकरून काढणे आणि सहकाऱ्यांना अडचणीत आणणे ही बाब चुकीची आहे. ख्वाजाच्या आत्मचरित्रातील खुलाशानंतर क्रिकेट ऑस्ट्रेलियालाही (CA) या वादावर भूमिका स्पष्ट करावी लागली आहे. २०१८ मधील सँडपेपरगेट प्रकरणाची नव्याने चौकशी केली जाणार नसल्याचे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉड ग्रीनबर्ग यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, गोपनीयतेच्या कारणास्तव या प्रकरणाचा तपास अहवाल सार्वजनिक केला जाणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींना आपली बाजू मांडता यावी, यासाठी एक स्वतंत्र आणि गोपनीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. इच्छुक व्यक्ती या व्यासपीठावर आपले म्हणणे मांडू शकतील. मात्र, कोणालाही त्यात सहभागी होण्यासाठी सक्ती केली जाणार नाही. या प्रक्रियेसाठी आगामी काळात एका स्वतंत्र व्यक्तीची नियुक्ती करून कामकाजाच्या अटी आणि नियम निश्चित केले जातील. दरम्यान, ख्वाजाच्या आत्मचरित्रातील खुलाशांमुळे २०१८ मधील सँडपेपरगेट प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून, ऑस्ट्रेलियन क्रिकेटमधील जुन्या वादाला नव्याने फोडणी मिळाली आहे. फॅनी डिव्हिलियर्स यांच्या आक्रमक विधानामुळे या वादाला आणखी धार येण्याची शक्यता आहे.

'ख्वाजाने सहकाऱ्यांचा विश्वासघात केला'

'९१.३ स्पोर्ट्सएफएम'शी (91.3 SPORTSFM) बोलताना फॅनी डिव्हिलियर्स यांनी उस्मान ख्वाजाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या ४० ते ५० वर्षांतील क्रिकेटचा अनुभव आणि इतिहासातील घटनांचा संदर्भ देत त्यांनी ख्वाजाच्या कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. डिव्हिलियर्स म्हणाले, "मी अधिकृतपणे सांगू इच्छितो की, ख्वाजा हा कदाचित क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा गद्दार आहे. गेल्या ४० ते ५० वर्षांत मी जे क्रिकेट पाहिले आणि वाचले आहे, त्यानुसार त्याने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. त्याने स्वतःच्याच सहकारी खेळाडूंचा विश्वासघात केला आणि त्यांना अडचणीत आणले."

केएल राहुलचं ऐतिहासिक अर्धशतक; भारताच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाच

महाईन्यूज । न्यूझीलंड

केएल राहुल आणि यशस्वी जयस्वाल यांनी पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी दमदार फलंदाजी करत भारताला पुन्हा सामन्यावर पकड निर्माण करून दिली. न्यूझीलंडचा पहिला डाव ३६८ धावांवर गुंडाळल्यानंतर भारताने दुसरा दिवसअखेर १ बाद १५९ धावा केल्या. भारत अजूनही २०९ धावांनी पिछाडीवर आहे.



भारताने आपल्या पहिल्या डावाची दमदार सुरूवात केली. सलामीवीर यशस्वी जयस्वालने ८५ धावांची आक्रमक खेळी केली. त्याचे शतक थोडक्यात हुकले. तर केएल राहुलने शांत आणि संयमी फलंदाजी करत एका बाजूने त्याला चांगली साथ दिली होती. यशस्वी बाद झाल्यानंतर केएल राहुलनेच डावाची धुरा आपल्या खांद्यावर घेत देवदत्त पडिक्कलच्या साथीने संघाला १५० धावांचा टप्पा पार करून दिला. दरम्यान, केएल राहुलने आपले अर्धशतक देखील पूर्ण केले.

केएल राहुलचे हे अर्धशतक ऐतिहासिक ठरलं. ३४ वर्षाच्या केएल राहुलने २०१४ मध्ये कसोटी पदार्पण केलं होतं. तो आपला ७१ वा कसोटी सामना खेळत आहे. विशेष म्हणजे न्यूझीलंडमधील त्याचा हा पहिलाच कसोटी सामना आहे. न्यूझीलंडमधील आपल्या पहिल्याच कसोटी सामन्यात केएल राहुलने अर्धशतकी खेळी केली आहे. दिवसअखेर तो ५२ धावा करून नाबाद राहिला. आता तिसऱ्या दिवशी तो हे अर्धशतक शतकात कनव्हर्ट करणार का याची उत्सुकता आहे.

टी२० क्रिकेटमध्ये हा कारनामा अभिषेक शर्माच्या नावावर आहे. तर वनडेमध्ये ५ भारतीय सलामीवीरांना सेना देशात किमान एक अर्धशतक ठोकले आहे. यात सचिन तेंडुलकर, विरेंद्र सेहवाग, रोहित शर्मा, सौरव गांगुली आणि शिखर धवन यांचा समावेश आहे. यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांच्या दमदार फलंदाजीमुळे भारतीय संघाने पहिल्या डावात भक्कम स्थिती निर्माण केली आहे. जयस्वालच्या आक्रमक खेळीने संघाला वेगवान सुरुवात मिळवून दिली, तर राहुलने अनुभवाच्या जोरावर डाव सावरला. न्यूझीलंडच्या भूमीवर पहिल्याच कसोटी सामन्यात अर्धशतक झळकावण्याची राहुलची कामगिरी विशेष ठरली आहे. आता तिसऱ्या दिवशी राहुल आपल्या अर्धशतकाचे शतकात रूपांतर करणार का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

केएल राहुल ठरला पहिला भारतीय सलामीवीर

पहिल्या डावात ४०० धावांचा पल्ला गाठणाऱ्या बांगलादेशला दुसऱ्या डावात हवी तशी कामगिरी करता आली नाही. संपूर्ण संग १६८ धावांवर गारद झाला. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी या डावात चांगली गोलंदाजी केली. फिरकी गोलंदाज सायमन हार्मरने या डावात सर्वाधिक ६ गडी बाद केले. तर कगिसो रबाडाने ३ गडी बाद केले. बांगलादेशकडून फलंदाजी करताना लिटन दासने सर्वाधिक ३९ धावांची खेळी केली. तर महफिजुल इस्लामने ३२ धावांची खेळी केली.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 21 नोव्हेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

महेशदादांच्या वाढदिवशी सामाजिक बांधिलकीचा 'सेवायज्ञ'!

डॉ. सुहास कांबळे यांच्याकडून १०० आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

वाढदिवस म्हणजे केवळ जल्लोष, सत्कार आणि शुभेच्छांचा सोहळा नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याची संधीही असते. हाच विचार कृतीत उतरवत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या वतीने आंबेगाव तालुक्यातील आदिवासी बांधवांसाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला.



> "आमचे मार्गदर्शक नेते आमदार महेशदादा लांडगे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजातील गरजू आणि वंचित घटकांना मदत करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत आम्ही आंबेगाव तालुक्यातील आदिवासी बांधवांपर्यंत मदत पोहोचविण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून तो गरजू कुटुंबांच्या उपयोगी पडला, तर त्यातून मिळणारे समाधान अधिक मोठे असते. या कुटुंबांच्या दैनंदिन गरजांमध्ये थोडा हातभार लावता आला, याचे समाधान आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. डॉक्टर म्हणून दुर्गम भागातील नागरिकांना मदत करण्याचा माझा प्रयत्न नेहमीच राहिला आहे. यापुढेही अशा सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचा आमचा प्रयत्न राहील."
>
> - डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

आमदार महेश लांडगे यांनी वाढदिवस अनावश्यक खर्च आणि दिखाव्याऐवजी समाजातील गरजू घटकांना मदत करून साजरा करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत डॉ. सुहास कांबळे यांनी 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत आंबेगाव तालुक्यातील गोहे खुर्द तसेच धुमाळवाडी-शिंगाडेवाडी येथील १०० गरजू आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या मदत किटचे वाटप केले. दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी मदतीचा हात देण्यात आला.

विशेष म्हणजे, डॉ. सुहास कांबळे हे डॉक्टर म्हणून सातत्याने पुणे जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना मदत आणि सहकार्य करत असतात. त्यांच्या या सामाजिक कार्याची जाणीव असलेल्या स्थानिक आदिवासी बांधवांनी आणि माता-भगिनींनी यावेळी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त मिळालेली ही मदत आमच्यासाठी अनमोल आहे. गरजूंच्या मदतीचा विचार करून असा माणुसकीचा संकल्प करणाऱ्या महेशदादांना उदंड आयुष्य लाभो, अशा भावनिक शुभेच्छाही उपस्थित आदिवासी बांधवांनी व्यक्त केल्या. तसेच डॉ. सुहास कांबळे यांचेही मनःपूर्वक आभार मानले.

या उपक्रमात साईनाथ हॉस्पिटलच्या व्हाईस चेअरमन उज्वला सुहास कांबळे, राजेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच शुभांगी साबळे, सुजाता सावंत, आंबेगाव तालुका भाजपा अध्यक्ष अशोक गभाले, अशोक मोरे, गिरीश वाघमारे, साईनाथ हॉस्पिटल व सचिन मेमोरियल फाउंडेशनचे पदाधिकारी व सहकारी यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

निलेशशेठ बोराटे युवा मंचाकडून खेड तालुक्यातील ४५० गरजू कुटुंबांना मदत किट

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवाभावी उपक्रमांतर्गत निलेशशेठ बोराटे युवा मंच तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समिती सभापती सौ. सुजाताताई निलेश बोराटे यांच्या वतीने खेड तालुक्यातील भोरगिरी, पाभे, भोबळे आणि बिव्हे या चार गावांमधील ४५० गरजू आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या मदत किटचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता दुर्गम भागातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करण्याचा संवेदनशील प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.



> "आमचे मार्गदर्शक नेते आमदार महेशदादा लांडगे यांचा वाढदिवस म्हणजे समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी काहीतरी करण्याची संधी आहे. महेशदादा नेहमीच सर्वसामान्य माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपण्याचा विचार मांडतात. त्यांच्याच विचारांतून प्रेरणा घेऊन निलेशशेठ बोराटे युवा मंचाच्या माध्यमातून दुर्गम भागातील आदिवासी बांधवांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. ४५० कुटुंबांना मदत करता आली, याचे मनस्वी समाधान आहे. समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान निर्माण करण्यासाठी यापुढेही आम्ही सातत्याने कार्यरत राहू."
>
> - डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

आमदार महेशदादा लांडगे यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेऊन हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. दुर्गम आणि आदिवासीबहुल गावांमध्ये प्रत्यक्ष भेट देत गरजू कुटुंबांपर्यंत जीवनावश्यक साहित्य पोहोचविण्यात आले. चार गावांतील तब्बल ४५० कुटुंबांना मदतीचा आधार मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक बांधिलकी जपत समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या मदतकार्यामुळे भारावलेल्या आदिवासी कुटुंबांनी आमदार महेशदादा लांडगे यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून अशीच समाजसेवा घडत राहो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे केल्याबद्दल निलेश बोराटे आणि विधी समिती सभापती सुजाता निलेश बोराटे यांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली. वाढदिवसानिमित्त मिळालेली ही मदत आमच्यासाठी मोठा आधार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

शहराला भामा आसखेडचे १६७ एमएलडी पाणी

आंद्रा, पवना, मुळशी व ठोकरवाडी धरणांतून पाणी आणण्याचे प्रयत्न; स्वतंत्र धरणाची गरज नाही

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहराला भामा आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी जानेवारी २०२७ ला मिळणार आहे. आंद्रा धरण पाणी योजनेची निविदा प्रसिद्ध केली जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या परवानगीनंतर पवना बंदिस्त जलवाहिनी काम सुरू केले जाईल. तसेच, मुळशी व ठोकरवाडी धरणातून पाणी आणण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. ते पाणी शहरासाठी पुरेसे आहे. त्यामुळे नवी मुंबईप्रमाणे महापालिकेने शहरासाठी स्वतंत्र धरण बांधण्याची गरज नाही, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.



शहरात गेल्या सहा वर्षांपासून दोन दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. त्यात पाणीकपातीमुळे शहरात काही भागांत कमी व अपुरा पाणीपुरवठा होत आहे. पाण्याचा तक्रारी वाढत आहेत. हाऊसिंग सोसायट्यांना पाण्यासाठी खासगी टँकरवर विसंबून रहावे लागत आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन महापालिकेने नवीन धरण बांधावे, अशी मागणी होत असल्याच्या प्रश्नावर आयुक्त बोलत होते.

आयुक्त सूर्यवंशी म्हणाले, की भूमिगत जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर भामा आसखेड धरणातून जानेवारीअखेरपर्यंत अतिरिक्त १६७ एमएलडी पाणी शहराला मिळणार आहे. आंद्रा धरण धरणातून भूमिगत जलवाहिनी, जॅकेवल, अशुद्ध पाणी उपसा केंद्र व इतर स्थापत्य कामांची निविदा दोन दिवसांत प्रसिद्ध केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या अंतिम परवानगीनंतर अनेक वर्षांपासून ठप्प असलेले पवना बंदिस्त जलवाहिनीचे काम सुरू केले जाणार आहे. तसेच, मुळशी धरण, ठोकरवाडी धरणातून पाणी आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सन २०४७ ची लोकसंख्येला पुरेल इतके पाणी मिळावे, असे प्रयत्न सुरू आहेत. त्याला बाऱ्यापैकी यश मिळत आहे. त्यामुळे महापालिकेसाठी स्वतंत्र धरण बांधण्याची आवश्यकता वाटत नाही. ती बाब व्यवहार्य नाही, असे ते म्हणाले.

निगडीतील अप्पूघरचे तिकीट अधिक असल्यास ते कमी करण्यास सांगण्यात येईल. महापालिका सर्वकष सांस्कृतिक धोरण निश्चित करत आहे. त्यासाठी सर्व गटनेते व पदाधिकाऱ्यांची लवकरच बैठक घेतली जाणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून रस्ते बांधण्यासाठी भोसरी उड्डाण पूल पाडण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराचे नाव जागतिक पातळीवर निर्माण होण्यासाठी मोशी येथे गोल्फ कोर्स क्लब पीपीपी तत्त्वावर विकसित केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पवना जलवाहिनी प्रकल्प शहरासाठी आवश्यक

जलसंपदा विभागाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना धरणातून भूमिगत जलवाहिनीद्वारे पिण्याचे पाणी घेण्याचे बंधनकारक केले आहे. त्यामुळे पालिकेने पवना जलवाहिनीचा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पावर पूर्वी दोनशे कोटी रुपये खर्च झाले आहेत. पवना धरणातून या प्रकल्पामुळे अतिरिक्त स्वच्छ पाणी मिळणार आहे. शहराला स्वच्छ पाण्याची आवश्यकता आहे. तो प्रकल्प पूर्ण झाल्यास पाणी स्वच्छ करण्याचा खर्च वाचणार आहे. पाणी गळती तसेच, जलप्रदूषण रोखले जाणार आहे, असे आयुक्तांनी सांगितले.

मोशी रुग्णालय पीपीपी तत्त्वावर

महापालिकेच्या रुग्णालय व दवाखान्यात उत्तम वैद्यकीय उपचार सुविधा दिल्या जात आहेत. वर्षाला तब्बल ८५० कोटी रुपये खर्च त्यावर होत आहेत. मुंबई महापालिकेने त्यांचे मोठे रुग्णालय पीपीपी तत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेवरील वाढता आर्थिक भार कमी करण्यासाठी मोशी रुग्णालय पीपीपी तत्वावर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथे महापालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसारच रुग्णांकडून उपचार शुल्क घेतले जातील. महापालिका पीपीपी तत्वावर थेरगाव येथे कर्करोग रुग्णालय बांधत आहे, असे आयुक्तांनी सांगितले. निगडीतील अप्पू घर, महापालिका भवनाशेजारी खासगी गृहप्रकल्पात बेसुमार वृक्षतोडप्रकरणी तत्काळ पंचनामा करून पोलिसात तक्रार करण्यात आली आहे.

नगरसेवक विनोद नढे यांच्या पत्राचा दणका; सूर्यवंशींकडील पाणीपुरवठा विभागाचा पदभार काढला!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडील पाणीपुरवठा विभागाचा अतिरिक्त पदभार आयुक्तांच्या आदेशाने काढून घेण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत हा आदेश जारी करण्यात आला असून, शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे पाणीपुरवठा विभागाचे विभागप्रमुख म्हणून असलेली जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. नगरसेवक विनोद नढे यांनी विभागाच्या कामकाजावर आक्षेप घेत आयुक्तांना पत्र दिल्यानंतर हा आदेश जारी झाला.



नढे यांनी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात पाणीपुरवठा विभागातील निविदा प्रक्रिया, कामांना दिलेल्या मंजुऱ्या आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले होते. सुमारे १९ हजार रुपयांची लाच मागितल्याच्या कथित प्रकरणाचाही त्यांनी पत्रात उल्लेख केला. या प्रकरणासह निविदा आणि कामांच्या मंजुरीतील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती. संबंधित अधिकाऱ्यांना अतिरिक्त विभागीय जबाबदारी देण्याबाबतही त्यांनी आक्षेप नोंदवला होता.

निविदा आणि कामांच्या मंजुरीची चौकशी करण्याची मागणी

महापालिकेच्या कारभारात पारदर्शकता असावी, जनतेच्या पैशांचा विनियोग नियमानुसार व्हावा आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, ही आपली भूमिका असल्याचे नढे यांनी स्पष्ट केले. अतिरिक्त पदभाराबाबत प्रशासनाने निर्णय घेतल्यानंतर आता नढे यांनी उपस्थित केलेल्या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणार का आणि चौकशीत अनियमितता आढळल्यास प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

महापालिकेची ७५ कोटींची बाळंतविडा योजना

वर्षाला २५ कोटींचा खर्च प्रस्तावित, योजनेच्या अंमलबजावणीवरून सामाजिक कार्यकर्त्यांचा विरोध

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत प्रसूती झालेल्या मातांना पौष्टिक खाद्यपदार्थ आणि नवजात बालिकांना बाळंतविडा संच देण्याची महत्त्वाकांक्षी योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेसाठी महापालिकेने तीन वर्षांच्या कालावधीसाठी तब्बल ७५ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. वर्षाकाठी सुमारे २५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेल्या या योजनेत स्तनदा मातांना पौष्टिक खाद्यपदार्थांचा संच, तर नवजात मुलींना आवश्यक वस्तूंचा समावेश असलेला बाळंतविडा दिला जाणार आहे. मात्र, महापालिकेची आर्थिक परिस्थिती, प्रलंबित ठेकेदारांची देयके आणि राज्य सरकारच्या योजनांची उपलब्धता लक्षात घेता या योजनेच्या औचित्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत शहरातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्याच पार्श्वभूमीवर प्रसूतीनंतर मातांना पौष्टिक आहार उपलब्ध करून देणे आणि नवजात बालिकांच्या संगोपनासाठी आवश्यक वस्तू देणे, हा या नव्या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. शहरातील रहिवासी तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये प्रसूतीची नोंद झालेल्या स्तनदा मातांना या योजनेचा लाभ देण्याचे नियोजन आहे. यासाठी समाज विकास विभागाने नुकतीच निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

या योजनेंतर्गत प्रसूती झालेल्या मातांना विविध पौष्टिक खाद्यपदार्थांचा संच देण्यात येणार आहे. त्यामध्ये खारीक, खोबरे, गूळ, फुटाणा डाळ, गावरान तूप, बदाम, खजूर, काजू, आळीव, जवस, तीळ, ओवा, बडीशेप आणि मेथीचे दाणे यांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व साहित्य दहा किलो क्षमतेच्या कापडी पिशवीतून लाभार्थी महिलांना वितरित करण्याचे नियोजन आहे.

प्रसूतीनंतर महिलांना पोषक घटकांची आवश्यकता असते. त्यामुळे पारंपरिक खाद्यपदार्थांचा समावेश असलेला हा संच मातांना देण्याचा विभागाचा विचार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील महिलांना या माध्यमातून मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, या संचातील वस्तूंची गुणवत्ता, त्यांचे प्रमाण आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत वितरणाची प्रक्रिया यावर योजनेचे यश अवलंबून राहणार आहे. या योजनेतील दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे नवजात बालिकांसाठी देण्यात येणारा बाळंतविडा संच. या संचामध्ये एकूण १३ वस्तूंचा समावेश आहे. त्यामध्ये फ्रॉक, झबले, कानटोपी, लंगोट, दुपटे, लोकरीचे स्वेटर, टोपी, पायमोजे, बेबी मसाज ऑईल, बेबी पावडर, पावडर ठेवण्यासाठी कंटेनर, बेबी सोप या वस्तू दिल्या जाणार आहेत.

शहरात दरवर्षी हजारो बालकांचा जन्म

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही वर्षांत जन्मदर मोठ्या प्रमाणात असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. महापालिकेच्या उपलब्ध माहितीनुसार, २०२२ मध्ये शहरात ३३ हजार ५३ बालकांचा जन्म झाला. २०२३ मध्ये ही संख्या ३१ हजार ४४३ होती. २०२४ मध्ये ३४ हजार ३५, तर २०२५ मध्ये ३५ हजार २२६ बालकांची नोंद झाली. यामध्ये दरवर्षी सरासरी १५ ते १६ हजार नवजात मुलींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर प्रसूती झालेल्या मातांना पोषक खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे आणि नवजात मुलींच्या सुरुवातीच्या संगोपनासाठी आवश्यक साहित्य देण्याची योजना आखण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये अतिक्रमणमुक्तीची मोहीम वेगात; ३० भूखंड मोकळे

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक सुविधांसाठी आरक्षित असलेल्या आणि भूसंपादन प्रक्रियेद्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेल्या भूखंडांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी महापालिका प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली आहे. शहरातील आरक्षित जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ६४ अतिक्रमित भूखंडांपैकी ३० भूखंडांवरील अतिक्रमणे हटविण्यात प्रशासनाला यश आले आहे. उर्वरित जागांवरील अतिक्रमणे महिनाभरात हटविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशाराही महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.



पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना नागरिकांना आवश्यक असलेल्या सार्वजनिक सुविधांसाठी महापालिकेने विविध ठिकाणी जागा आरक्षित केल्या आहेत. मात्र, या आरक्षित जागांवर अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि अन्य स्वरूपाचे बेकायदा वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. विशेष म्हणजे, काही भूखंडांचे भूसंपादन करून संबंधित जागामालकांना हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) किंवा रोख स्वरूपात नुकसानभरपाई देण्यात आली होती. तरीही संबंधित जागांवर अतिक्रमण कायम असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने शहरातील आरक्षित जागांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणामध्ये एकूण ६४ भूखंडांवर अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट झाले. यातील बहुतांश जागा महापालिकेला हस्तांतरणीय विकास हक्कांच्या माध्यमातून प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे नुकसानभरपाई देऊनही जागा ताब्यात न देणे किंवा ताब्यात आलेल्या जागांवर पुन्हा अतिक्रमण करणे, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी कठोर भूमिका घेतली आहे.

महापालिकेच्या शहरात सुमारे दोन हजार जागा आणि मालमत्ता आहेत. मात्र, आरक्षित जागांपैकी केवळ ३५ टक्के जागा महापालिकेच्या प्रत्यक्ष ताब्यात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आरक्षित भूखंडांचा प्रत्यक्ष ताबा मिळविणे आणि त्यांचे संरक्षण करणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान बनले आहे. यासाठी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना संबंधित जागा तातडीने ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिकेने आरक्षित केलेल्या तसेच ज्यांच्या मोबदल्यापोटी संबंधित जागामालकांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे, अशा सर्व जागा ताब्यात घेऊन त्याभोवती सुरक्षा कुंपण उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून प्रत्यक्ष कारवाई सुरू आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF
LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support



ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in